प्रस्तुत संकेत स्थळ अशा परिवाराबद्दल आहे ज्यांनी सत्कार्याने महाराष्ट्रामध्ये एक उत्कृष्ट इतिहास निर्माण केला व जे नेतृत्वगुण संपन्न परिवारातील आहे.

1) 500 वर्षापासून या परिवाराचे पूर्वज दुर्दैवाने मुस्लिम राजवटीत जगले

2) श्री शिवछत्रपतीच्या काळात 17 व्या शतकामध्ये सर्व सदस्य महामारी मध्ये मृत्यू पावली व फक्त एक पुरुष सदस्य वाचला व पुढे आज 1000 सदस्य असलेले कुटुंब झाले आहे.

या सन्माननीय कुटुंबाचा महान वारसा थोडक्यात खालील प्रमाणे आहे:-

**कुटुंबाचा (घराण्याचा) उगम व इतिहास**

भौगोलिक दृष्ट्या परभणी जिल्हा हा मध्य महाराष्ट्रात वसलेला आहे. या विभागात अनेक दशकापासून मुस्लिम निजामाची राजवट होती. भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी पोलीस कारवाई करून 17 सप्टेंबर 1948 रोजी हा विभाग भारतात विलीन केला. या मराठवाडा विभागाचा स्वातंत्र्यदिन भारताच्या स्वातंत्र्य दिनाबरोबर साजरा केला जात नाही, तो 17 सप्टेंबर रोजी साजरा केला जातो; कारण 13 ते 17 सप्टेंबर 1948 रोजी भारताचे गृहमंत्री सरदार पटेल यांनी पोलीस कारवाई करून जुन्या राजवटीतून या विभागाची मुक्तता केली.

16 व्या शतकातील महामारी मध्ये दुधगावच्या या शिंदे कुटुंबातील सर्व पुरुष जे कोंडण्य गोत्राचे होते, मरण पावले गेले व एक-दोन पुरुष जिवंत राहिले ...(काही ज्येष्ठांच्या मते युद्धामध्ये सर्व मारले गेले).

शिंदे घराण्यातील एक बाळ जिवंत राहिले तेव्हा तेथील माळी समाजाच्या राऊत कुटुंबांनी शिंदे कुटुंबाच्या त्या बाळाची काळजी घेतली, त्यांच्या जमिनी कसल्या, त्यांना सर्व प्रकारचे संरक्षण दिले. शिंदे घराण्यातील हे मुल जेव्हा मोठे झाले तेव्हा पूर्णा तालुक्यातील गौर या गावातील पारवे कुटुंबातील मुलगी शिंदे कुटुंबात दिली गेली. त्यावेळी शिंदे घराण्याकडे जवळपास 2500 एकर जमीन होती. गौर च्या पारवे घराण्यांनी विनंती केली की त्यांना त्यातील अर्धा वाटा द्यावा व ते मान्य केले गेले. (एक प्रकारे आजच्या रिवाजाप्रमाणे एक प्रकारचा हा उलटा हुंडा देणे प्रकार घडला... ☺)

समीर दुधगांवकर यांना अजूनही आठवते की, एकदा शिंदे घराण्यातील सदस्य पारवे कुटुंबातील व्यक्तींशी विनोदाने म्हणाले की, "तुम्ही आमची अर्धी जायदाद घेतली, परंतु आमचा वंशवेल वाढविण्यासाठी मदत केली, असो !!" आजच्या घडीला 2023 मध्ये श्री बापूसाहेब पारवे वय वर्षे 92 जे की  लिंबाजीराव नागोराव दुधगांवकर यांचे विश्वसनीय निकटवर्ती आहेत ते सांगतात की त्यांचे मूळ गाव गौर तालुका पूर्णा आहे, ज्याचा संदर्भ आजही दिला जातो..

गावातील माळी समाजाच्या राऊत कुटुंबाशी शिंदे घराण्याच्या वारसदाराचे पालन पोषण केले, आधार दिला. त्यामुळे शिंदे घराण्यांनी राऊत हेच आडनाव लावण्यास सुरुवात केली असावी. 1900 च्या आसपास जेव्हा जमिनीच्या नोंदी सुधारित करण्याची वेळ आली तेव्हा राऊत हे आडनाव लावण्यात आले. यापूर्वी जमीन मालकीच्या नोंदीमध्ये मुलाच्या व वडीलाच्या नावाचीच नोंद केली गेली. यामागे मुस्लिम शासकाचा मोठा कटाचा भाग असावा जेणेकरून तुमची वंश परंपरागत ओळख मिळू नये. असे असूनही मानवी इच्छाशक्ती इतकी प्रबळ आहे की  जिच्या जोरावर मराठवाड्यातील प्रत्येक खेड्यात आपल्या वंशाचा वारस जपला आहे व वैभवशाली वारसा पुढे आणला गेला आहे.

## <u>आधुनिक इतिहास</u>

निजामशाहीच्या कालखंडात हा विभाग पाथरी तहसील म्हणून प्रसिद्ध होता. दुधगांवकर, बोराडे, गोरेगावकर या तीन सुप्रसिद्ध कुटुंबातून या विभागातील गाव खेड्याची काळजी घेण्याचे काम केले गेले. खासकरून जेव्हा जुलमी निजाम सरदार कासिम रिझवी यांनी मराठवाड्यातील लोकांवर अनन्वित अत्याचार केला .

श्री ज्ञानोबा पाटील दुधगांवकर (शिंदेशाहीराऊत ) हे जिंतूर तालुक्यातील एक मोठे नेते होते व ते एक अध्यात्मिक व्यक्ती होते. ते विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडात प्रसिद्ध पंढरपूरची आषाढी वारी करत असत.

पंढरपूरच्या आषाढीची वारी ही महाराष्ट्राची संस्कृती व धार्मिक अशी मोठी परंपरा आहे. अनेक संतांच्या दिंड्या निघतात व पंढरपूर येथे पोहोचतात. यापैकी दुधीकर दिंडी क्रमांक 23, साठी दुधगांवकर कुटुंबाला विशेष आशीर्वाद मिळालेला आहे. संत ज्ञानेश्वर माऊलीच्या पादुकांचा अभिषेक करण्याचा मान दुधगांवकर कुटुंबाला लाभलेला आहे. हा अभिषेक पंढरपूर जवळ वेळापूरच्या उघडेवाडी येथे रिंगण संपल्यानंतर होतो.

महाराष्ट्राच्या पंढरपूरच्या वारी परंपरेत अनेक पिढ्यांपासून श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांच्या अभिषेकाची अखंड परंपरा दुधगांवकर कुटुंबातून आजही चालू आहे. अशा प्रकारचे अनेक दिव्य आशीर्वाद लाभलेल्या अश्या कुटुंबाची ही विलक्षण यशोगाथा आहे.

पंढरपूरच्या वारीत त्या काळात फारशा सोयी सुविधा नव्हत्या. अशाच एका वारीमध्ये ज्ञानोबा पाटील यांचे देहावसन झाले. अशा दुःखद प्रसंगी कुटुंबातील तानुबाई पारवे शिंदेशाहीराऊत यांनी सर्वांची जबाबदारी घेऊन खंबीरपणे शिंदे कुटुंबाचा वारसा पुढे नेला. तानुबाईने सर्व गावचा कारभार पाहिला. त्यांचा एकुलता एक मुलगा व नातेवाईकांच्या मदतीने जुलमी रझाकारांना धैर्याने तोंड दिले. सरकारी अधिकारी उर्मटपणे वागल्यावर नागोराव दुधगावकरांनी त्या अधिकाऱ्यास झोडपून काढले. श्री नागोराव दुधगावकरांचे इ.सन 1950 मध्ये जालना येथे एका दवाखान्यात आजारामुळे निधन झाले.

## <u>शुभाशीर्वाद लाभलेले हिंदू</u>

श्री गणेशराव नागोराव दुधगांवकर यांच्या नम्र विनंतीस मान देऊन श्री क्षेत्र जगन्नाथ पुरी येथील पीठाधीश्वर पूज्य पाद जगद्गुरु शंकराचार्य स्वामी  निश्चलानंद सरस्वती जी यांनी  परभणीत अनेक दशकाच्या खंडानंतर भेट दिली. हे एक महत्त्वाचे योगदान श्री गणेशरावांच्या प्रयत्नांनी घडले. शुभ आशीर्वाद व दुर्मिळ भाग्यशाली असा हा क्षण होता. केवळ अध्यात्मिक क्षेत्रच नाही तर मराठवाडा व महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये दुधगांवकर कुटुंबाने महत्त्वाचे योगदान दिलेले आहे.

उदाहरणच द्यायचे झाले तर श्री लिंबाजीराव नागोराव दुधगांवकर यांचे नाव परभणीच्या परिसरात आजही आदराने घेतले जाते व असे म्हटले जाते की परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा कारभार त्यांच्यासारखा कोणीच चालवून दाखवलेला नाही. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये माजी मंत्री श्री गणेशराव दुधगांवकर हे प्रसिद्ध व अतिशय दुर्मिळ असे चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व होय. ज्या प्रकारच्या नेत्याची मराठा युवकांना खुप अलीकडे प्रकर्षाने गरज भासली.

## गणेशरावांचे महत्वपूर्ण योगदान:-

- ➢ ज्या क्षणी 2 फेब्रुवारी 1983 ला मंत्रिपदाची शपथ घेतली त्याचवेळी प्रकर्षाने त्यांना जाणीव झाली की मराठवाड्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांची विकासासाठी गरज आहे. छत्रपती संभाजीनगर येथे (बजाज कंपनी यावी या ) निर्णय प्रक्रियेत श्री गणेशराव दुधगांवकर यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.
- ❖ अमरावती विद्यापीठ, महानगरपालिका स्थापनेचा निर्णय घेतला, महसूल कार्यालय व आयजीपी कार्यालय आणले.
- ❖ नंतरच्या काळात IGTR, CEDT, MCED, CIPET इत्यादी संस्थांची स्थापना केली.
- ❖ 1980 ज्या दशकात हाजीरा गॅस पाईपलाईनची संकल्पना मांडली जी सुरत, बुलढाणा, परभणी, नागपूर, पारदी व ओरिसा पर्यंत जाईल. तदनंतर रु 15000 करोडच्या मूलभूत सुविधांचे प्रकल्प, तसेच जे रासायनिक खते कारखाने, प्लास्टिक कारखाने, उद्योगांना व निवासी घरांना लागणारी स्वस्त वीज व घरगुती गॅस जोडणी यासाठी लागणारे जाळी निर्माण करणारे प्रकल्प येऊ शकले असते.
- ❖ विधानसभेचे सभापती मा. श्री वि. स. पांगे यांच्याकडून रोजगार हमी योजनेचे मंत्री म्हणून प्रशंसा मिळवली.

## समीर गणेशराव दुधगांवकर

आदरणीय दुधगांवकर कुटुंबाच्या त्यानंतरच्या पिढीमध्ये अमेरिकेतून शिक्षण घेऊन परतलेले व महाराष्ट्र उद्योगाचे नेतृत्व करणारे समीर गणेश दुधगांवकर हे परभणी जिल्ह्याची सेवा करत आहेत. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नेतृत्व करून समीर यांनी सर्वांना अभिमानीत केले आहे. संपूर्ण परभणी जिल्ह्यात समीर यांनी आपल्या कार्यामुळे स्वतःचे एक वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. समीर यांना ईश्वरकेंद्रित कर्मयोगी म्हणून ओळखले जाते. त्यांनी भगवद्गीतेचा अभ्यास इ. स. 2002 पासूनच सुरू केला जेव्हा ते अमेरिकेत अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होते. त्यानंतर 2014 मध्ये माननीय श्री नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर समीर यांनी अध्यात्मिकता दाखवली असे नाही तर या पूर्वीपासूनच 2002 पासून समीर गणेशराव दुधगांवकर, एक वैचारिक नेतृत्व,अंतर्मनाच्या आवाजाचे ऐकून दैवी शिकवणींना बांधले गेले होते. श्री समीर हे सातत्याने जनतेला उद्देशून भगवद्गीतेतील श्लोकांचे **आजच्या परिस्थितीचा संदर्भ देऊन विश्लेषण करतात.**

भारतीय जनता पक्षाने मराठा समाजाचा अपमान केल्याने श्री समीर यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. बीजेपी हिंदुत्ववादी पक्ष आहे. मराठा समाजाने मुस्लिम आक्रमणकारी राजापासून समाजाचे रक्षण केले आहे. आज शेती क्षेत्रात काम करणारा हा कुणबी समाज अडचणींमुळे मागास वर्गामध्ये समाविष्ट करावे म्हणून मागणी करतो आहे. लोकशाही पद्धतीने **श्री मनोज जरांगे पाटलांच्या** सोबत सातत्याने लढतो आहे. आंतरवाली सराटीत एक करोड लोकांची सभा झाली. त्यावेळी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात होते पण त्यांनी साधी दखल घेतली नाही व यातुन भाजपाने मराठा समाजाचा अपमान घडवून आणला म्हणून समीर यांनी प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला...